21 OCT 2021 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या पिढीला खऱ्या गांधी विचारांशी जोडा

## अरुण खोरे; गांधी अभ्यास केंद्रातर्फे डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. २० : ''महात्मा गांधी यांच्या विचारांचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी गांधी विचारांचे सैद्धांतिक, भावनिक आणि वैचारिक पातळीवर प्रसारण करावे लागेल. नव्या पिढीला खऱ्या गांधी विचारांशी जोडण्याची आज गरज आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व गांधी विचारांचे अभ्यासक अरुण खोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रामार्फत 'डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमाला-२०२१' अंतर्गत आयोजित 'गांधींच्या पुनःस्मरणाची गरज का?' यावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते. श्री. खोरे म्हणाले, ''मार्टिन ल्युथर किंग यांच्या कृष्णवर्णीय चळवळीपासून ते नेल्सन मंडेला, बराक ओबामापर्यंत गांधीजींच्या विचारांचा प्रभाव दिसून आला आहे. मात्र, अलीकडे तो विचार पुसून टाकण्याचे, त्यांची प्रतिमा संकुचित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. गांधी चरित्रातील तपशिलांची मोडतोड करून सादर करण्याचे काम केले जात आहे. गांधीजींच्या संदर्भात कार्य करणाऱ्या सेवा संस्था, संघटनांवर गांधी विचारांचे विद्रुपीकरण थांबविण्याची जबाबदारी आहे.'' डॉ. चौसाळकर म्हणाले, ''हत्या, हिंसा, द्वेष अथवा सूडभावना या मानवजातीच्या विरुद्ध आहेत. त्यांचे गौरवीकरण अथवा समर्थन करणे चुकीचे आहे. निरामय समाजनिर्मितीसाठी महात्मा गांधी यांच्या सद्विचारांचेच अनुसरण करणे आवश्यक आहे.'' गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. रामदास भटकळ, दशरथ पारेकर, नागोराव कुंभार, डॉ. अरुण भोसले, डॉ. नंदा पारेकर, विवेक कोरडे, प्रा. चंद्रकांत लंगरे, किशोर बेडकिहाळ आदी उपस्थित होते.

21 OCT 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वडणगे येथे विविध क्षेत्रांत यश मिळविलेल्या भूमिपुत्रांचा सत्कार

# यश मिळविण्यासाठी ध्येयवेडे होणे गरजेचे : डी. टी. शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

**वडणगे :** क्षेत्र कोणतेही असो, वलय निर्माण करण्याची ताकद स्वतःकडे असेल तर कोणाची ओळख लागत नाही. कोणतीही गोष्ट अशक्य नसते. फक्त त्यासाठी जिद्द, ध्येय बाळगावे. प्रामाणिकपणे कष्ट केल्यास निश्चितच यश पाठीमागून येते. त्यासाठी प्रत्येक तरुणाने ध्येयवेडे होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



वडणगे येथील सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने प्राचार्य डॉ. महादेव नरके, अजित पाटील, अरुण पाटील, रघुनाथ पाटील या भूमिपुत्रांचा सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला.

वडणगे येथील सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने भूमिपुत्रांनी विविध क्षेत्रात मिळविलेल्या पुरस्कारानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळासाहेब पाटील होते. तत्पूर्वी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सर्वपक्षीय कृती समिती व शिवपार्वती झाडवाट कुरण मंडळ यांच्यावतीने सत्कार केला. प्राचार्य डॉ. महादेव नरके यांना राज्यस्तरीय कोरोना योद्धा पुरस्कार, अजित पाटील यांना 'रोटरी'चा कोरोना योद्धा पुरस्कार, रघुनाथ पाटील यांना रोटरीचा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार, निर्माण कन्स्ट्रक्शनचे अरुण पाटील यांना बांधकाम अभियंता गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरूंच्या हस्ते सत्कार झाला.

प्राचार्य नरके म्हणाले, गेल्या पंचवीस वर्षांत केलेल्या समाजकार्याचे फळ म्हणजेच हा सत्कार आहे. जगात कुठेही गेलो तर जन्मभूमीतील सत्कार कायम स्मरणात राहील. निर्माणचे अरुण पाटील म्हणाले, आंतरराष्ट्रीय पुरस्कारापेक्षा माझ्या जन्मभूमीत झालेला सत्कार हा आपुलकीचा वाटतो. यावेळी मुन्वर मुल्ला, इंद्रजित पाटील, डॉ. सुनील पाटील, सरपंच सचिन चौगले, बी. एच. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. जि. प. माजी सदस्य बी. एच. पाटील, सरपंच सचिन चौगले, पं. स. सदस्य इंद्रजित पाटील, डॉ. विलास पोवार, डॉ. सुनील पाटील, उपसरपंच सयाजी घोरपडे, पोलीस पाटील उमेश नांगरे, आदी उपस्थित होते. डॉ. विलास पोवार यांनी स्वागत केले. राजू पोवार यांनी प्रास्ताविक तर आर. बी. देवणे यांनी सूत्रसंचालन केले. सुनील परीट यांनी आभार मानले.

लोकमत

# गजानन पाटील यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर : ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ




डी. बी. पाटील यांचे कनिष्ठ बंधू आणि कृषिभूषण गजानन बळवंत पाटील यांच्या कार्याच्या 'बापू' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन आज (गुरूवारी) सायंकाळी पाच वाजता होणार आहे. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन होईल. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, आमदार जयंत आसगावकर, हुतात्मा शिक्षण व उद्योग समूहाचे प्रमुख वैभव नायकवडी उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 OCT 2021

लोकमत







कोल्हापुरात बुधवारी विविध महाविद्यालयांतील पदवीचे वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरु झाले. विवेकानंद महाविद्यालयात प्रवेशद्वारात विद्यार्थ्यांची नावनोंदणी, डोस घेतल्याची माहिती नोंद करून आणि थर्मल स्कॅनरने तपासणी करून त्यांना वर्गात प्रवेश देण्यात आला. २) महावीर महाविद्यालयात पदवीचे वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरु झाले. त्याचा आनंद महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थिनींनी सेल्फी घेत व्यक्त केला. 3) महावीर महाविद्यालयात पदवी द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी गुलाबपुष्प देऊन केले. (छाया : आदित्य वेल्हाळ)

# कॉलेज भरले... कडक शिस्तीत, नियमांत

## संख्या कमी, तरीही उत्साह अधिक : तब्बल दीड वर्षानंतर विद्यार्थ्यांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने तब्बल दीड वर्षानंतर बुधवारी कोल्हापुरातील विविध महाविद्यालयांमधील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्ग ऑफलाईन पद्धतीने भरले. त्यामुळे कॉलेज कॅम्पस विद्यार्थ्यांनी फुलला. कोरोना लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश देण्याची अट असल्याने महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सरासरी ४० टक्के होती, तरीही त्यांचा उत्साह अधिक होता. गुलाबपुष्प देऊन, लसीकरणाबाबतची माहिती देत प्राचार्य, प्राध्यापकांनी या विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करत महाविद्यालयांतील अकरावी, बारावीचे वर्ग ४ ऑक्टोबरपासून भरले. त्यानंतर २० ऑक्टोबरपासून शासन निर्देश आणि शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग शहरातील विविध ३५ महाविद्यालयांत सुरु झाले.



टी.वाय.बी.ए.च्या अंतिम वर्षात आहे. वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरु झाल्याचा आनंद वाटत आहे. महावीर महाविद्यालयाने आमचे स्वागत केल्याने खूप छान वाटले.

- वैष्णवी साळोखे, प्रयाग चिखली

ऑनलाईन शिक्षणाला मर्यादा आहेत. त्यामुळे ऑफलाईन वर्ग सुरु झाल्याने खूप बरे वाटले. शिक्षणाची गती वाढणार आहे. आता पुन्हा आमच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये.

- बाळासाहेब गरकळ, कंदलगाव

सकाळी साडेसात ते आठदरम्यान कला, वाणिज्य, तर दहा ते साडेअकरा यावेळेत विज्ञान विद्याशाखेचे वर्ग भरले. विद्यापीठाच्या सूचनेनुसार कोरोना लसीचे किती डोस पूर्ण झाले आहेत. याची नोंद महाविद्यालयांकडून घेण्यात आली. दोन डोस पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश देण्यात आला. इतरांना दुसरा डोस पूर्ण होईपर्यंत ऑनलाईन पर्यायाचा वापर करण्याची सूचना केली. वर्गात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या मित्रांची गळाभेट घेत, तर विद्यार्थिनींनी सेल्फी घेत आनंद व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागातील अंतिम वर्षातील वर्ग भरण्यास सुरुवात झाली; मात्र दोन डोसच्या अटींमुळे तुरळक उपस्थिती होती. तसेच बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या परीक्षा सोडता बी.ए. आणि बी.एस्सी. अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाचे निकाल अद्याप जाहीर झालेले नाहीत. त्यात प्रशासनाने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे अंतिम वर्षाचे वर्ग सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे वर्ग सुरू करण्याबाबत महाविद्यालयांची अडचण झाली. कोरोनामुळे कृषी महाविद्यालयाच्या परीक्षा लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे दिवाळीनंतर या महाविद्यालयातील वर्ग भरणार आहेत.

21 OCT 2021 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात महाविद्यालये विद्यार्थ्यांनी फुलली

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** करोना संसर्गामुळे गेले दीड वर्ष बंद असलेली महाविद्यालये बुधवारपासून सुरू झाली. मर्यादित उपस्थिती असली तरी सळसळत्या तरुणाईच्या उत्साहाने परिसर फुलला होता.

शिवाजी विद्यापीठाच्या दुसऱ्या वर्षाचे निकालच जाहीर नसल्याने तिसऱ्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू नाही. फक्त अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्याची विद्यापीठाने सूचना आहेत. आज करोना नियमांचे पालन करूनच विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश दिला. प्रवेशद्वारावरच विद्यार्थ्यांची तपासणी केली जात होती. दीड वर्षानंतर महाविद्यालय सुरू झाल्यामुळे विद्यार्थी सुद्धा महाविद्यालयांत येण्यास उत्सुक असल्याचे चित्र पाहायला मिळाले. लसवंतांनाच प्रवेश, सामाजिक अंतर, मुखपट्टी हे नियम लागू होते. महाविद्यालयांच्या संकुलातील गजबज दिवाळीनंतरच वाढण्याची शक्यता आहे.

काही महाविद्यालयांमध्ये गुलाल फुले तर कोठे पेढे खाऊ घालून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

महासत्ता एकच आवृत्ती
21 OCT 2021
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबासाहेबांवरील महाकाव्यग्रंथ कृतज्ञतेने ओथंबलेला

## कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के

**कोल्हापूर, ता.२० (प्रतिनिधी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील २०२१ कवितांचा समावेश असलेला महाकाव्यग्रंथ कृतज्ञतेने ओथंबलेला आहे, असे भावोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज येथे काढले.

तरोडा-खुर्द (जि. नांदेड) येथील प्रा. अशोककुमार दवणे यांनी संपादित केलेल्या महामानव' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीच्या २०२१ कवितांचा समावेश असलेल्या महाकाव्यग्रंथाचे आज महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी प्रकाशन करण्यात आले. कोल्हापूर येथील प्रकाशन सोहळा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ कार्यालयात पार पडला. त्यावेळी कुलगुरू बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाकाव्यग्रंथ' हा उपक्रम एकमेवाद्वितिय स्वरुपाचा असून त्यासाठी संपादक म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळणाऱ्या प्रा. दवणे यांचे कार्य अभिनंदनीय आहे. राज्यभरातून आलेल्या सुमारे पाच हजारांहून अधिक कवितांमधून निवडक २०२१ कवितांचे संकलन व संपादन करणे, ही फार मोठी कामगिरी आहे.

यावेळी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव कांबळे यांच्यासह प्रा. जेलीत कांबळे, प्रा. प्रेरणा व्यवहारे, डी.एस. कौशल कांबळे, डॉ. मधुकर धुतूरे, गौतम वर्धन, संजय कुर्डूकर, पी.डी. सरदेसाई, प्रमोद जवळगेकर आदी उपस्थित होते.

महासत्ता एकच आवृत्ती 21 OCT 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या कल्याण निधी योजनेंतर्गत एक कोटीहून अधिक निधी प्रदान

कोल्हापूर, ता.२० (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजनेअंतर्गत कोव्हिड-१९च्या दुसऱ्या लाटेच्या कालखंडात १ कोटी ५ लाख ७५ हजार रुपयांचे एकूण ११३ प्रस्ताव मंजूर करण्यात आल्याची माहिती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.आर.व्ही. गुरव यांनी दिली.

कल्याण निधी योजनेची माहिती देताना डॉ. गुरव म्हणाले, शिवाजी विद्यापीठांतर्गत असलेल्या विविध संलग्नित महाविद्यालये तसेच अधिविभागांतील विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी विद्यार्थी विकास विभागामार्फत सन २०१४-१५ पासून कल्याण निधी योजना सुरू करण्यात आली. याअंतर्गत या घटकांकडून प्रतिवर्षी अत्यंत माफक शुल्क आकारले जाते. या संकलित रकमेमधून योजनेसाठीचा खर्च केला जातो. यातील कोणाही घटकाचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना दीड लाख रुपये कल्याण निधी दिला जातो. विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत असताना बाहेरगावी नैसर्गिक वा अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना २ लाख रुपये दिले जातात. अपंगत्व आले तरी सुद्धा अपंगत्वाच्या प्रमाणात २५ हजारांपासून ते कमाल दीड लाख रुपयांपर्यंत निधी प्रदान केला जातो.

21 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये पुन्हा गजबजली

## ५० टक्के क्षमतेसह प्रारंभ; गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्यामुळे तब्बल दीड वर्षानंतर बुधवारी महाविद्यालयाचा परिसर पुन्हा गजबजून गेला. दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश दिले गेले. त्यामुळे द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त दिसून आली. काही महाविद्यालयांनी गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.





**कोल्हापूर : १) महावीर कॉलेजमध्ये गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. २) वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने कॉलेज परिसर गजबजून गेला होता. (छाया : पप्पू अत्तार)**

ऑफलाईन तसेच ऑनलाईनद्वारे वरिष्ठ महाविद्यालये सुरू झाली. ज्या विद्यार्थ्यांनी कोरोनाचे दोन डोस घेतले त्यांचे लसीचे प्रमाणपत्र पाहून महाविद्यालयात प्रवेश देण्यात आला.

सकाळच्या सत्रात कला व वाणिज्य शाखेची, तर दुपारच्या सत्रात शास्त्र शाखेची महाविद्यालये सुरू झाली. महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातराज्यसरकारकडून काही नियमावली तयार करण्यात आली आहे. या नियमांचे पालन करूनच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. महाविद्यालय रितसर सुरू झाल्याने प्राध्यापकांकडून अध्यापनाचे काम सुरू झाले आहे. डोस न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी पर्याय म्हणून ऑनलाईन शिक्षण प्रणाली सुरू ठेवण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाचा द्वितीय वर्षाचा निकाल नुकताच लागला आहे. त्यामुळे काही महाविद्यालयांत तृतीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित राहू शकले नाहीत; पण प्रवेशाची माहिती घेण्यासाठीही विद्यार्थ्यांची गर्दी दिसून आली.

> ज्या विद्यार्थ्यांनी दोन डोस घेतले आहेत, अशा प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. दुसऱ्या वर्षातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची तिसऱ्या वर्षात प्रवेश घेण्यासाठीची लगबग सुरू आहे. कॉमर्स कॉलेजमध्ये एक दिवस मुले, तर एक दिवस मुलींचे वर्ग सुरू ठेवण्यात येतील.
>
> **- प्राचार्य व्ही. ए. पाटील**

21 OCT 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को...

# कॉलेज कट्टे फुलले

कोल्हापूर : वैभव गोंधळी

कोरोना महामारीमुळे तब्बल दीड ते दोन वर्ष बंद असलेली महाविद्यालये अखेर सुरू झाल्याने बुधवारी कॉलेज कट्टा रंगीबेरंगी वस्त्र परिधान केलेल्या युवा-युवतींनी अक्षरशः फुलून गेला होता. दीर्घ कालावधीनंतर महाविद्यालयांतील मित्र-मैत्रिणी भेटल्याने तरुणाईचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने शहरातील महाविद्यालये गजबजून गेली. कॉलेज कॅम्पसमध्ये मित्र-मैत्रिणींची भेट घेताना तरुणाई उत्साहात दिसत होती.

राज्यभरातील महाविद्यालये साधारण दीड वर्षांच्या कालावधीनंतर बुधवारपासून सुरू झाली. महाविद्यालयांमध्ये कोरोना प्रतिबंध नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश देण्यात आला.

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीदेखील लसीचे दोन्ही डोस पूर्ण केल्याची काळजी घेण्यात येत आहे. मास्क, सोशल डिस्टन्सिंग पाळून वर्ग सुरू झाले आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून कोरोना संसर्ग आटोक्यात असल्यामुळे, तसेच १८ वर्षांवरील लसीकरणाचे प्रमाणही गेल्या काही महिन्यांत वाढल्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत २० ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बुधवारपासून शिवाजी विद्यापीठातील विविध विभाग सुरू झाले. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन वर्ग सुरू होण्याची प्रतीक्षा लागून राहिली होती. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पसही फुलून गेला.

## दीड वर्षांनी कॉलेज सुरू

## विद्यार्थ्यांच्या आनंदाला आले उधाण



कोल्हापूर : महाविद्यालये पुन्हा खुली झाली असून पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये गर्दी केली होती. (छाया : तय्यब अली)

### कॅन्टीन आणि कटिंग चहाचे घोट

कॉलेज कॅन्टीन आणि कटिंग चहा हे वेगळंच समीकरण आहे. आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत कॅन्टीनमध्ये कटिंग, वडापाव रिचवण्याचा आनंद काही औरच असतो. कॅम्पसमध्ये दाखल झाल्यानंतर युवक-युवतींची पावले आपसूकच कॅन्टीनकडे वळली. आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत कॉलेजमधील दुनियादारीमध्ये ही तरुणाई रमून गेली, तर त्यानंतर सोशल मीडियावरही तरुणाईची पहिल्या दिवसाची 'दिल दोस्ती दुनियादारी' दिसून आली.

### याला जीवन ऐसे नाव..!

कॉलेजचे दिवस जसे होते तसे अनुभवण्याचा आनंददायी क्षण काही औरच असतो. कॉलेज कॅन्टीन, खेळ, फनिगेम्स, मैदानी खेळ असे ते मंतरलेले दिवस असतात. त्यामुळे कधी एकदा कॉलेज सुरू होते असेच महाविद्यालयीन युवक-युवतींना वाटत असते. अखेरीस महाविद्यालय सुरू झाल्याने आवारात आल्या-आल्या अनेकांनी 'याला जीवन ऐसे नाव,' असे म्हणत कॉलेज कॅम्पसचा आनंद लुटला.

21 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीड वर्षांनी बहरली महाविद्यालये

## विद्यार्थ्यांचे स्वागत; कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांत अध्यापन सुरू

कोल्हापूर, ता. २० : जिल्ह्यातील महाविद्यालयात आज विद्यार्थ्यांचे आगमन झाले. कॉलेज परिसरातील कट्टे पुन्हा तरुणाईने फुलले. कँन्टीनमधला किलबिलाट सुरू झाला. ग्रंथालयातील कपाटांचे दरवाजे उघडले. वर्गातील फलकावर अक्षरे उमटली. तब्बल दीड वर्षांनी महाविद्यालय परिसर युवा मनांनी चैतन्यमयी झाला. कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करून महाविद्यालयात अध्यापनाला प्रारंभ झाला.

कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत महाविद्यालये बंद झाली. परीक्षाही ऑनलाईन झाल्या. निकालही ऑनलाईन जाहीर केले. त्यामुळे दीड वर्षापासून महाविद्यालयाचे कॅम्पस सुनेसुने होते. इमारती विद्यार्थ्यांच्या अनुपस्थिती भकास वाटत होती. राज्य शासनाने आज (ता. २०) पासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि पुन्हा एकदा महाविद्यालये तरुणाईने बहरली. दोन दिवसांपासून महाविद्यालयात स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करून घेण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासनाने दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालये सज्ज ठेवली होती. महावीर महाविद्यालयात गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कॉमर्स महाविद्यालयातही विद्यार्थ्यांना फुले देऊन त्यांना वर्गात बसवले. गोखले महाविद्यालयातही विद्यार्थ्यांचे स्वागत प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी केले.




**कोल्हापूर : शहरातील महाविद्यालये बुधवारी सुरू झाली. परंतु बहुताशः विद्यार्थ्यांनी मात्र कॉलेजकडे पाठ फिरवली. दसरा चौकातील शहाजी महाविद्यालयात आलेले विद्यार्थी.** (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

### दोन डोस झालेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश

बहुतांशी महाविद्यालयांनी प्रवेशद्वारावर सॅनेटायझर मशिन ठेवले होते. मास्क परिधान करणे, निर्धारीत अंतर ठेवणे याचे पालन केले. ज्या विद्यार्थ्यांचे दोन डोस झाले आहेत, अशांनाच प्रवेश देण्यात आला. ज्यांचे डोस अद्याप झालेले नाहीत त्यांच्यासाठी ऑनलाईन अध्यापनाची सुविधा महाविद्यालयांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 OCT 2021 तरुण भारत

# कॉलेज कॅम्पस गजबजले

## महाविद्यालयातील पदवी अंतिम वर्षाचे वर्ग सुरू : विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने राज्य सरकारने विद्यापीठ अधिविभाग व महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे बुधवारी तब्बल पावणेदोन वर्षानंतर कॉलेज कट्टे विद्यार्थ्यांनी फुलले. वर्ग संपल्यानंतर कट्ट्यावर बसून मित्र–मैत्रिणींनी गप्पा मारण्याचा आनंद लुटला. त्याचबरोबर कॉलेज कँन्टिनही फुल्ल झाली होती. महाविद्यालयांच्या वतीने गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

कोरोना नियमांचे पालन करीत ५० टक्के क्षमतेने महाविद्यालये सुरू करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालये बुधवारपासून सुरू झाली. वर्गात आल्यानंतर ऑनलाईन शिक्षणापासून सुटका झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांनी कॉलेज परिसर फुलला. आम्हालाही प्रत्यक्ष ज्ञानादानाचा आनंद मिळत असल्याचे अनेकांनी सांगितले. विद्यार्थ्यांशिवाय कोणत्याच शाळा, महाविद्यालयांना शोभा नसल्याची भावना प्राध्यापकांनी व्यक्त केल्या. वर्ग, कार्यालय, कॉलेज कॅम्पसमध्ये विद्यार्थीच्या उपस्थितीमुळे आनंदाचे वातावरण होते. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठीही विद्यार्थ्यांच्या गर्दी होती. विद्यापीठाच्या नियमांप्रमाणे एका बेंचवर एका विद्यार्थ्याला बसवले होते. विद्यार्थ्यांचे कोरोना लसीचे दोन डोस झाल्याची खात्री करूनच प्रवेश दिला जात होता.



कोल्हापूर : महाविद्यालयात आपल्या मैत्रिणींशी गप्पा मारताना महाविद्यालयीन विद्यार्थीनी. (छाया : इम्रान गवंडी)

### दिवाळीनंतर वसतिगृह सुरू

पदवी अंतिम वर्षाचे वर्ग ५० टक्के क्षमतेने सुरू झाले आहेत. दिवाळीनंतर वसतिगृह सुरू केली जाणार आहेत.

डॉ. राजेंद्र लोखंडे
(प्राचार्य, महावीर महाविद्यलय)

### विद्यापीठ अधिविभाग अद्याप बंदच

विद्यापीठातील अधिविभागात शिक्षण घेणारे सर्वाधिक विद्यार्थी ग्रामीण भागातील असतात. त्यामुळे वसतिगृह सुरू झाल्यानंतरच विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढणार आहे.

### प्रत्यक्ष शिक्षणाचा आनंदच वेगळा

ऑनलाईन शिक्षण घेत असताना नेटवर्क नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मित्र–मैत्रिणींपासून दूर असल्याने अभ्यासासंदर्भात चर्चाही बंद झाल्या होत्या. आज वर्गात प्रत्यक्ष वर्गात बसून शिक्षण घेताना वेगळाच आनंद मिळत आहे.

– वैष्णवी साळोखे
(महावीर महाविद्यालय)

### शिक्षणाबरोबर प्रॅक्टीकल करता येणार ...

एफ. वाय. बी. ए.चे निम्मे आणि एस. वाय. बी. ए.चे संपूर्ण वर्ष ऑनलाईन शिक्षण आणि प्रॅक्टीकल करण्यात गेले. आता प्रत्यक्ष कॉलेज सुरू झाल्याने शिक्षणाबरोबर प्रॅक्टीकलही करण्याचा आनंद मिळणार आहे.

– कोमल भोसले
(महावीर महाविद्यालय)

21 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ठाकरे सरकार राबवणार खास अभियान

# आता 'कॅम्पस' लसीकरण

**कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचा देशभरातील आकडा १०० कोटीपर्यंत पोहोचत असताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही लस देण्याकरता ठाकरे सरकार 'कॅम्पस' लसीकरण राबवणार आहे. आरोग्य मंत्री राजेश टोपे आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी याविषयी आढावा घेत त्याबाबतचे सुतोवाचही केले आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षणाचा लाभ घेता यावा आणि शैक्षणिक नुकसान टाळले जावे, यासाठी आता सरकार अधिक सकारात्मक झाले आहे.**



प्रतिनिधी
मुंबई

दरम्यान, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांनी राज्यातील महाविद्यालयांचा आढावा घेतला. अनेक ठिकाणी महाविद्यालये सुरु झाली असली तरी त्यांची संख्या मर्यादितच आहे. बंद महाविद्यालयांवर कारवाई करु नये, अशा सूचना त्यांनी विद्यापीठांना केल्या आहेत. त्याचबरोबर २५ पर्यंत महाविद्यालये सुरु करावीत, असे आदेशही दिले आहेत.

आजपासून राज्यातील महाविद्यालये सुरु झाली. तथापि दोन लसींची अट ठेवण्यात आल्याने विद्यार्थी संख्या आटोक्यात राहणार आहे. त्याशिवाय कोरोना महामारीचे भय अद्यापही आहेच. देशभर लसीकरणाने वेग घेतला आहे.

राज्यातही लसीकरणाची आकडेवारी चांगलीच आहे. १८ ते ४४ वयोगटासाठी लसीकरण सुरु केल्यानंतर बऱ्यापैकी विद्यार्थ्यांनीही स्वयंप्रेरणेने लसीकरण करुन घेतले होते. केंद्र सरकारने १०० कोटी लसीकरणाचे टार्गेट दिल्यानंतर राज्य सरकारने नवरात्रोत्सव काळात 'मिशन कवच कुंडल'सारखे अभियान राबवत लसीकरणाला वेग देण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रतिसादही मिळाला.

आता त्यापुढील पाऊल उचलले जाणार असून आरोग्यमंत्री टोपे यांनी बुधवारी त्याबाबत सुतोवाच केले आहे. कॅम्पस इंटरव्ह्यूच्या धर्तीवर कॅम्पस लसीकरण मोहीम राबवल्यास राज्यातील लसीकरणाला वेग येऊन त्याचा फायदा मिळेल.

### विद्यार्थ्यांसाठी विशेष मोहीम



आरोग्य मंत्री राजेश टोपे म्हणाले, महाविद्यालये सुरु करण्याबाबत मंत्री सामंत यांच्याशी चर्चा झाली. आता यापुढे १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांच्या लसीकरणाला प्राधान्य देणार आहे. त्यासाठी कॅम्पस लसीकरण ही विशेष मोहीम राबवणार असल्याचे टोपे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना पोस्ट व्हॅक्सिनेशन केअर किट उपलब्ध करुन दिले जाईल.

### २५ पर्यंत महाविद्यालये सुरु करा



मंत्री उदय सामंत म्हणाले, टप्प्याटप्प्याने महाविद्यालये सुरू करावीत. कॅम्पसमध्ये लसीकरण कसे करता येईल, यावर चर्चा सुरु आहे. कॅम्पसमध्येच विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार पहिला–दुसरा डोस उपलब्ध होऊ शकतो. कॅम्पस लसीकरण मोहीम पुढच्या आठवड्यात विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्याच्या विचारात असल्याचेही ते म्हणाले.

21 OCT 2021 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Colleges reopen, but attendance low; online lectures continue

**Abhilash Botekar & Rahul Gayakwad** | TNN



Students undergo health screening at a Nashik college

**Nashik/Kolhapur:** Many colleges resumed the offline classes on Wednesday, though the online lectures are continuing for those who cannot come to the campuses. As it is mandatory for students returning to the campuses to have taken both doses of the vaccine, the attendance was on the lower side. Moreover, many students want to return to offline classes only after Diwali.

In Nashik, some of the colleges have set up vaccination facilities for the students who are yet to be inoculated, while others are coordinating with the local civic bodies and health agencies for vaccine camps.

"We have made all arrangements, including getting thermal guns; ensuring that only fully vaccinated students are allowed in; and setting up a health centre," said VN Suryawanshi, the principal of HPT and BYK college.

There was some confusion among students who are yet to turn 18, as the colleges — as per government instructions — are not to allow students who have not got both the vaccine doses. "I and two of my friends were restricted from entering the college because we are still not eligible for the vaccines as we are not 18 years old yet. Some of our friends who had taken one dose too were not allowed," said Rahi (name changed), a student of a college in Nashik city.

Prof VB Gaikwad, member management council, Savitribai Phule Pune University (SPPU), who is also the principal of KTHM college, however, stated that the children under 18 have no restrictions. We have directed our staff to ensure no such student is stopped." Gaikwad added that a vaccination centre has been set up on the campus, and eligible students can approach the administration to get the jab.

Some students, were more eager to spend time with friends. "I will spend time with my friends now. We will start attending the classes after Diwali," said Ramesh (name changed), a student.

Rajesh Deore from Satana, said: "It would be waste of money to rent a room in the city for few days. It is better to return after the Diwali vacation for offline classes."

In the Kolhapur district, the colleges resumed for the final-year students, but attendance was low. The final-year students who did turn up were seen taking selfies and catching up with their friends. Chaitanya Salokhe, an engineering student, said, "It was good to be back in the classroom and meet friends. Although we had been in touch digitally, the feeling of sitting in the classroom together is something else."

Manjusha Patil, a student of Shivaji University, said, "Vaccine for the 18-30 age group had started late and many students have not got both the doses. The administration should allow entry to students who have taken at least one dose."

T K Sargar, vice-principal of the New College , said, "The college has reopened. As the count of fully vaccinated students is low, attendance was low too."